# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२१-२२** **दिनांक २५/०७/२०२२**

## अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २२/०७/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मिरा-भाईंदर परिसरात काही बांगलादेशी नागरिक अनधिकृतपणे राहत असून नयानगर पोलीस ठाण्याचे हद्दीमधील सेक्टर नं. ७, देवेंद्र बिल्डींग, बिल्डींग नं.१८/१९/२०, शांतीनगर, मिरारोड पुर्व या ठिकाणी बिल्डींगमध्ये कामास आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोनि श्री देविदास हंडोरे यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह सेक्टर नं.७, देवेंद्र बिल्डींग, बिल्डींग नं.१८/१९/२० शांतीनगर, मिरारोड पुर्व या ठिकाणी साफळा रचुन ०४ पुरुष बांगलादेशी नागरिकांना दिनांक २३/७/२०२२ रोजी १५.४५ वा. ताब्यात घेवून त्यांचेकडे प्राथमिक विचारपूस केली असता ते पारपत्र व व्हिसाशिवाय अनधिकृतपणे वास्तव्य करीत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने त्यांचे विरुध्द सहापोउपनि. उमेश हरी पाटील, नेम. अ.मा.वा.प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.५२५/२०२२ भारतीय पासपोर्ट अधि. १९२० चे कलम ३(अ), ६(अ) सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४(अ) प्रमाणे दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. देविदास हंडोरे, सपोउपनि. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, मपोहवा/सुप्रिया तिवले व चा.पोहवा/गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.